Rashtriya Shikshan Prasarak Mandal, Beed's

# Lokmanya Tilak Mahavidyalaya ,Wadwani

Tq. Wadwani, Dist. Beed, Maharashtra- 431144 India

NAAC Accredited 'B' Grade

Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad



## CERTIFICATE

This is to certify that Prof/Dr./Mr./Ms Shweta B. Choudhare of Mes Arts, Commerce & Science College, Sonai, Newasa, Ahmednagar has participated in One Day International Interdisciplinary Webinar on the topic Thoughts of Dr. B.R. Ambedkar Organized by the Department of History & Internal Quality Assurance Cell (IQAC) on Monday 12 April 2021 and published /presented a paper entitled "सामाजिक न्यायाला न्याय देणारा युगकर्ता : डॉ. आंबेडकर"

Hence Certified

Place- Wadwani

Date- 12 April 2021

| | | |
|---|---|---|
| Dr. B. G. Kulkarni | Sanjay Salunke | Principal Dr. Kishan Pawar |
| Co-convener | IQAC Coordinator | Chief Organizer & Convener |

# Current Global Reviewer


Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

12 April 2021 Special Issue- 40 Vol. I


# Thoughts of Dr. B.R. Ambedkar





Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal Dr. Kishan Pawar

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 40 Vol. I**

**Title of the issue :** - **Thoughts of Dr. B.R. Ambedkar**

© **All rights reserved with the College & publisher Price : Rs. 600/-**

**Editor – Arun Godam**
**Latur**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

EDITION :
April 2021

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 40 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648

April 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

# सामाजिक न्यायाला न्याय देणारा युगकर्ता: डॉ. आंबेडकर

डॉ. श्वेता बाबूलाल चौधारे

(कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सोनई, ता. नेवासा, अहमदनगर,महाराष्ट्र 414105)

**बीज शब्द** : *स्वराज*,सामाजिक न्यायाचे प्रणेते, *संपत्ति*,सत्याग्रह

भारतातील केवळ दलितच नाही,दलित्तेतर बहुजन समाजाला समानतेची फक्त स्वप्न न दाखवता, त्या स्वप्नानां प्रत्यक्ष आभाळाएवढा विस्तार आणि बळ देण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या बाबासाहेबांसाठी त्यांच्याशी निगडित कोणत्याही विषयावर लिहिलेला आलेख हा थोड्या-बहुतेनेसारख्याच घटना-प्रसंगानी भरलेला, मात्र तितक्याच मनस्वी भावनांनी भारावलेला असेल; यात शंकाच नाही.हजारो वर्षाच्या देहिक-दैविक व मानसिक गुलामगिरीतून सोडवण्यासाठी बाबासाहेबांनी केलेले कार्य भारतातील जातिव्यवस्थेने पछाडलेल्या साध्या-भोळ्यामाणसासाठी एखायाअवतार कार्य व कथे पेक्षा वेगळे नाही. पण बाबासाहेबांच्या कार्यास अवतार कार्याची उपमा देणे त्यांच्या शिकवणीचा किम्बहुना त्यांच्या सिद्धांताचा अपमान होईल. आंबेडकरांचे विचार,सिद्धांत त्यांच्या कार्याचा आढावा घेतल्याशिवाय समजून घेणे शक्य नाही. गेल्या काही काळापासून अगदी हेतुपुरस्कर पणे जात-धर्माच्या आधारावर सामाजिक विघटनाची प्रक्रिया आपल्या देशाच्या मोठ्या शहरा पासून ते छोट्या गाव- वस्त्या पर्यंत विशिष्ट मानसिकतेने प्रेरित होउन राबवली जात आहे.या मानसिकतेने दूषित समुहा द्वारे सुरुवातीलाच जाती-धर्मा च्या आधारावर महापुरुषांना जातीच्या चौकटिक अशा पद्धतीने बंद करण्यात येत आहे की प्रत्येक विशिष्ट समुदाय आपल्या- आपल्या महापुरुषांना घेऊन इतका संकुचित वृतीने वागत आहे की इतर कुठलाही समाज त्या महापुरुषाला सहज स्वीकारनार नाही, नव्हे-नव्हे त्या महापुरुषास स्वीकारतानाही तो समाज घटक तेव्हा ही संकुचित पद्धतीने स्वतःचे वर्तन दर्शवतो. असेच काही संविधान कर्ते, सामाजिक न्यायाचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत दिसून येते. म्हणून सामाजिक जाणीवेतुन कर्तव्यास प्रधानता देत न्यायासाठी झटणा*ऱ्या*आंबेडकरांच्या कार्याचा आणि त्यांच्या विचारांचा आढावा घेण्याचा प्रयत्न येथे करण्याचा प्रयत्न केला आहे.

सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत सर्वसामान्यपणे अशा समाजाची कल्पना केली जाते जिथे सामाजिक स्तरावर कोणत्याही प्रकारचे अन्यायाचे अस्तिव नसावे. मूळतः समाज ही व्यापक संकल्पना आहे, ज्यात अनायसे धार्मिक, सांस्कृतिक, राजकारण, अर्थकारण असे अनेक कंगोरे आहे. म्हणून सामाजिक न्यायात सर्व स्तरावर कोणत्याही भेद-भाव शिवाय समानता, प्रगति व उन्नतिच्या ही समान संधी, अधिकाराचे समान वाटप, शोषण रहित समाजाची संकल्पना मान्य केली जाते. सामाजिक न्याय या संकल्पनेच्या मुळाशी सामाजिक जीवन उत्तम पणे जगण्याची भावना असते. मात्र उत्तम जीवन ही जीवनयापन करण्याची अभिलाषा आहे, जिच्या मुळाशी 'अर्थकारनाचे' मोठे आणि महत्वपूर्ण योगदान असते, आहे आणि भविष्यात ही राहणार. हे काळवाचक तीनही शब्द घेण्यामागे कारण एवढेच की बदलना*ऱ्या काळाप्रमाणे आज ही* शतकानुशतके दारिद्रय आणि परोपजीवी म्हणून हीनवल्या गेलेल्या अस्पृश्य समाजात पाहिजे तशी उन्नती झाली नाही. अशा वेळीतत्कालीन पुणे येथून प्रसिद्ध होना*ऱ्या 'स्वराज' सारख्या पत्राला जाब विचारणारे आंबेडकर आठवतातआणि सामाजिक न्याय स्थापनेसाठी चे त्यांचे कार्य.*

सामाजिक समते साठी अडसर ठरणा*ऱ्या अनेक बाबी पैकी एक म्हणजे : संपत्ति. आपल्या समाजात जाती च्या नावाखाली संपत्तिच्या केंद्रीकरणचा डाव कैक जूना आहे. याच जाती च्या नावाखाली काही वर्ग संपत्ति चा संग्रह करण्याचा अधिकार प्राप्त करत होते, तर काही ना हा अधिकार डावलण्यात येत होता, इतकेच नाही अल्प संपत्ति संग्रह ही त्याना शिक्षेस पात्र बनवत होता. दुर्दैवी भाग हा की या संपत्ति च्या बलावर दरिद्री वर्गावर अन्याय केले जाऊ लागले. संपत्ति च्या जोरावर सर्व सुख-सोयी, ऐश्वर्य भोगनारा एक वर्ग आणि काबाडकष्ट करून ही भाकरी चा शोध घेत गरिबी च्या ठिगळानी अस्तित्व जपनारा उपाशी वर्ग दूसरी कडे.* स्वातंत्र्याच्या 70 वर्षापेक्षाही अधिक काळानंतरही समाजात 'आहे रे' आणि 'नाही रे' हे वर्ग आहेतच.आंबेडकर यांच्या मते संपत्ती ही राष्ट्राच्या भरभराटी साठी आवश्यक वस्तू आहे. पण या संपत्तीच्या जोरावर समाजाच्या सधन व्यक्तींनी गरिबांचे शोषण करून त्यांच्या प्रगतीच्या वाटा बंद करणे योग्य नाही. संविधानाने दिलेल्या प्रत्येक अधिकारासाठी चाळणी व्यवस्था या सधन वर्गाने तयार करून ठेवली आहे. स्वतःचे सामाजिक-आर्थिक वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी बहुतेक साधने या वर्गाने स्वतःच्या ताब्यात ठेवलेली दिसून येतात.भारतीय समजातील असमतोल परिस्थितीची आंबेडकर यांनी आपल्या व्याख्यानातून जातीवादी आणि वर्गवादी मीमांसा केली आहे. जातीच्या आधारावर अधिपत्य टिकून ठेवण्यासाठी संपत्तीचा वापर करणारा शिष्टवर्ग मात्र मालक-मजूर वादा समयी उपदेशाचे खिरापत वाटतो. या प्रवृत्ति वर ही आंबेडकर टेवढ्याच प्रखरतेने बोट ठेवतात.

सामाजिक न्यायाबाबत बोलतांना 'माणसाला माणूसपण देणारे'-'अर्थ' हे महत्वाचे साधन आहे. हे आंबेडकरांनी ओळखले होते. म्हणून बहुजन समाजाचा आर्थिक स्वातंत्र्यासाठी संघर्ष त्यांना अभिप्रेत होता. मात्र आर्थिक स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्यांना अस्पृश्यांच्या विरोधात संपत्ती वापरून त्यांच्या संघर्षाचा बिमोड करू पाहणाऱ्यांना आंबेडकरांनी खुल्या मंचावरून खडसावले होते. विशेष म्हणजे आंबेडकरांच्याही काळात जाती-पातीच्या भेद-भावातून अन्याय, पुरातनपंथी संकीर्ण विचार इ. विरुद्ध आवाज उठवणा*ऱ्या* अस्पृश्यांनाहिन्दू धर्मातुन बहिष्कृत करण्याच्या धमक्या मिळत असत. अस्पृश्यांच्या या सत्याग्रह विरुद्ध सनातनी सधन वर्गाने बहिष्काराचे शस्त्र उपसले होते. अशा वेळी आंबेडकरांनी अस्पृश्यांना याबाबत जागृत करून त्यांच्या मनात समता प्राप्ति ची धग पेटवली. भारतीय समाजात वर-वर दिसून येणाऱ्या याचक-दाता या नात्यातील स्वार्थी विनिमय त्यांनी बहुजनांच्या समोर आणला.

सामाजिक दृष्टीने अप्रगत मागासवर्गाच्या दयनीय स्थितीचे आकलन करत हजारो वर्षापासून बहिष्कृत जीवन जगणा*ऱ्या* वर्गास अयोग्य - अपवित्र मानल्यामुळे नैतिक दृष्ट्या बहुजन समाजाचा झालेला अपकर्ष व त्याना लाभलेली प्रतिकूल परिस्थिति समजावून या स्थिति तुन बाहेर पडण्यासाठी बहिष्कृत वर्गास ही राजकीय सामर्थ्य आणि जातवार प्रतिनिधित्व मिळावे असे त्याना वाटे. उन्नतीसाठी मग ती आर्थिक असो वा सामाजिक त्या साठी आत्मभान आणि स्वाभिमान आवश्यक आहे. मात्र स्पर्शा-स्पर्श, विटाळ या भावनेतून भारतीय समाजाचा एक मोठा हिस्सा सामाजिक न्यायदानाच्या प्रक्रियेतून बाहेर फेकला गेला होता.

शास्त्राचा आधार घेऊन ही सर्वसामान्य माणूस म्हणून जे हक्क मिळणे क्रमप्राप्त होते बहुजन वर्गा साठी ते फक्त नाकारलेच गेले नाही, तर हिरावून घेतले गेले. अनेक सामाजिक प्रश्नाच्या मूळाशी विशिष्ट मताने प्रेरित राजकीय ध्येय साध्यता आंबेडकरानीअव्हेरली होती. सामाजिक अन्याय दूर करने आणि या साठी लढा देने त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट बनले होते. यात काही शंका नाही. या कार्यासदेशवासियानी ही पवित्र कार्य म्हणून स्वीकारले पाहिजे. हा त्याचा आग्रह सविधानाच्या प्रतिज्ञेत स्पष्ट दिसतो.

सामाजिक न्याय प्राप्ति साठी अडसर ठरणारी अस्पृश्यता ज्यावर उभा हिन्दू धर्म ख*ऱ्या अर्थाने या शिवाय* स्वता. ला पूर्ण मानण्यास तयार नव्हता. अशा 'अस्पृश्यतेला प्रोत्साहन देणारे शास्त्र ही जनतेचा अपमान करणारी आहे', असे आंबेडकरांना वाटे. ज्या ज्ञान व शहाणपणाच्या बळावर समाजातील विशिष्ट वर्ग प्रबळ बनून अन्य लोकांवर जुलूम करतो, ते ज्ञान आंबेडकरानी जातीवादी चाकोरी तुन मुक्त केले. जुन्या परंपरा, रूढी चालीना कवटाळून अन्यायाचा प्रतिकार करण्याऐवजी, त्या अन्यायासच आपले पूर्वकर्म, नशीब मानना*ऱ्या*समाजाला आंबेडकरांनी केवळ विचारांनीच नव्हे आपल्या प्रत्यक्ष कृतीतून जागे केले.

धार्मिक आध्यात्मिक विचारांचा प्रचंड पगडा असलेल्या समाजाला त्यांनी त्यांच्याच भाषेत समजावले. सत्याग्रह करणा*ऱ्या अस्पृश्याची* बाजू योग्य आहे हे*स्पृश्याना* आणि विरोध करणाऱ्या *अस्पृश्यां*नाही पटवून देण्यासाठी त्यांनी हिंदू धर्मग्रंथ, कधी गीता आदि ची उदाहरण दिली. बहुजन- *अस्पृश्यासाठी* सामाजिक समतेची मागणी करताना याच त्याना सोबत घेऊन देवळात जाऊन प्रत्यक्ष-दर्शन पूजा करणेकिंवा सार्वजनिक पाणवठ्यावर वा तळ्यावर जाऊन जुन्या अन्यायाच्या पाशाला तोडने कसे रास्त आहे, हे आंबेडकरानी बहुजन समाजास पटवून सांगितले.

आंबेडकरांच्या मते 'अस्पृश्यता ही इतकी अपमानकारक गोष्ट आहे की तिच्या निवारणार्थ काहींचे प्राण खर्ची पडली तरी हरकत नाही'. मनुष्य विटाळ घालवण्यासाठी पशुचे मूत्र शिंपडन्याच्या भावनेचा धिक्कार करताना अस्पृश्यांना पशूचे मलमूत्राऐवढे ही पवित्र *अस्पृश्यां*ना नसावे. ही भावना स्वाभिमानी माणसाला जगण्यासारखी नाही. या विचारातून येणारी अस्वस्थता आंबेडकरांच्या विचारांत स्पष्टपणे डोकावताना दिसते. म्हणून आंबेडकराची सामाजिक न्यायाची संकल्पना देशातील बहुजनांना माणुसकीच्या दृष्टीने पाहत माणूस म्हणून जगण्याचा आधारच नाही, अधिकार देते.

सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी आंबेडकरांनी ज्या संघर्षाचा मार्ग स्वीकारला तो मार्ग स्वाधीनता संग्रमातील क्रांतिकारकांसमान रक्तरंजित मार्ग नव्हता, न गांधीजीचा अति टोकाची सौम्य भूमिका घेणारा 'अहिंसों परमो धरम' सारखा मार्ग होता. आंबेडकरांनी समता व न्याय हक्काच्या मागणी साठी ज्या सत्याग्रहाचा आधार घेतला होता ज्यामध्ये खऱ्या अर्थाने सत्याचा आग्रह होता आणि तो तेवढाच क्रांतिकारी सुद्धा होता.

भारतीय परिप्रेक्ष्यात स्पृश्यता - अस्पृश्यता ठरवताना धर्माचा आधार घेत असमानता दर्शवणाऱ्या अनेक मर्यादा टाकण्यात आल्या आहे. हिंदू धर्मात वर्ण मर्यादा ठरवून घेण्यासाठी जात-पंथ या आधारावर बेटीबंदी, रोटीबंदी, लोटी बंदी, भेटी बंदी ठरवून देण्यात आली आहे. मर्यादेच्या या स्वरूपावरून अप्रत्यक्ष पणे त्या-त्या जातीचा सामाजिक दर्जा ठरविण्यात आला. याच मर्यादा स्पृश्य-अस्पृश्यतेच्या मुळाशी असून अस्पृश्यता घालून सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी 'बेटी बंदी' उठवणे हाच मार्ग योग्य असल्याचे आंबेडकरांचे म्हणणे होते. ते वर्तमानातही तितकेच सत्य आणि सनातनी-पुरातन पंथी लोकाना बोचनारे आहे.आंबेडकरांच्या मते'बेटी बंदी'चा बांध फोडणे यातच खरे अस्पृश्यतानिवारणा आहे.

ज्या समाजाने बहुजनाच्या अस्तित्वाला, हक्कालाच मान्यता दिली नाही, त्या समाजाला पुन्हा एकदा सामाजिक प्रहावात आणण्यासाठी स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातही आंबेडकरांनी कायदेशीर तरतुदी साठी चा ही आग्रह धरला व संविधानात यास मूर्त रूप दिले. मात्र या पेक्षा ही अधिक महत्व त्यानी सामाजिक न्यायास दिले. आंबेडकरांच्या मते – *"अस्पृश्य लोकाना कायदेशीर स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्या ची जास्त जरुरी आहे. सामाजिक स्वातंत्र्य जोपर्यंत प्राप्त झाले नाही, तो पर्यंत तुम्हाला कायदयाने कितीही स्वातंत्र्य दिले तरी त्याचा उपयोग होणार नाही."* सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेत शिक्षणाचे अनन्या साधारण महत्व त्यानी ओळखले होते. म्हणून स्वातंत्र्य पूर्व मुंबई प्रांतिक विधिमंडळात त्यानी शिक्षणासाठी अनुदानाची मागणी ती ही मुले-मुली दोहो साठी केलेली आढळते. मागसलेल्या वर्गाना शिक्षणाच्या बळावर पुढे आणण्यासाठी शिष्यवृति, या साठी अंदाजपत्रकात जाती-जमाती निहाय रक्कम ठेवण्याचा आग्रह ते करतात. बहुजन समाजात शिक्षण प्रसार होने गरजेचे आहे, असे त्याना वाटे. सविधानात ही सर्व नागरिकाना समान संधी असावी, अश्या पद्धतीचे समान संधीचे तत्व चा अंतर्भाव दिसून येतो, तो आंबेडकर यांच्या मुळेच

सामाजिक न्यायाची संकल्पना ही समजातील वेगवेगळ्या स्तराप्रमाणे बदलत असते. तरी भारतीयांचे समस्याचे मूळ स्थान शोधून त्या ऐवजी समतेची मागणी करत सामाजिक परिवर्तनाचे नायक म्हणून आंबेडकर समोर येतात. हजारो वर्षा पासून मुकया समाजाला त्यानी अधिकाराची वाणी दिली, आत्मविश्वास दिला, समाजाच्या मुख्य पटलावर ज्यांची छाया सुद्धा नव्हती, त्याना अस्तित्वाचे भान दिले. म्हणून सामाजिक न्याय सारख्या संकल्पनेला ही न्याय देणारा युगकर्ता डॉ. आंबेडकर या शिवाय दूसरे कोणी नाही.

सारांश :

भारतासारख्या देशामध्ये जितकी भाषिक-सांस्कृतिक विविधता मिळते, त्या पेक्षा जास्त इथे समस्या मिळतील. यातील काही समस्या प्राकृतिक आहे, तर काही मानव निर्मित. सभ्यता-संस्कृति च्या बळावर सम्पूर्ण विश्वात अद्वितीयतेचा ठसा उमटवनारया आपल्या देशात शतकानुशतके बहुसंख्य (म्हणूनच बहुजन) वर्गास केवळ अन्याय आणि बंधनात खिचपत ठेऊन त्याना प्रगतिच्या अनेक संधी पासून लाब ठेवले गेले. स्वतंत्र्याच्या 70 वर्षानंतर ही संधी, न्याय, आदर मिळवण्यासाठी याच देशातील अनुसूचित जाती-जमाती, स्त्री वर्ग संघर्ष करत आहे. मात्र फरक हा की आज संविधानाने दिलेले अधिकार आणि आंबेडकरांचे विचार आज लढण्याची प्रेरणा देत आहे

संदर्भ ग्रंथ सूची :


1. बोल महामानवाचे (खंड 2)-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे - डॉ. नरेंद्र जाधव
2. डॉ आंबेडकर जीवन दर्शन – विजय कुमार पुजारी
3. Castes in India: Their Mechanism, Genesis and Development -Dr. B.R. Ambedkar (http://ambedkar.navayan.com/book/castes-in-india-their-mechanism-genesis-and-development/)

# Current Global Reviewer

Indexed (SJIF)

ISSN 2319-8648

Impact Factor- 7.139

CURRENT GLOBAL REVIEWER

ISSN 2319-8648

Chief Editor
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION

Publisher
Shaurya Publication